# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.03.2025** **वार-गुरुवार**

---

**विधिमंडळ**

पुण्यातील ससून सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता गेल्या दीड वर्षात सातत्याने बदलत राहिल्यानं स्थावर व्यवस्थेचं संचलन योग्य पद्धतीनं होत नसून व्यवस्थापनात त्रुटी राहिल्या आहेत, या मुद्द्याकडे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत सभागृहाचं लक्ष वेधलं. सरकारच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून ससून रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया मोफत होतात. मात्र ससूनमध्ये हृदयरोगतज्ज्ञ कंत्राटी पद्धतीनं नेमलेले आहेत. ससूनमध्ये कायमस्वरूपी हृदयरोगतज्ज्ञ नियुक्त करणं आवश्यक आहे, याकडेही शिरोळे यांनी लक्ष वेधलं.

**वाहतूककोंडी**

पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाढती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आणि नागरिकांचा प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर करण्याच्या दृष्टिनं शनिवारवाडा ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवारवाडा या दोन भुयारी मार्गांच्या निर्मितीसाठी आमदार हेमंत रासने पाठपुरावा करत आहेत. या प्रस्तावाला गती देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची भेट घेत प्रकल्पांच्या मंजुरीसाठी तातडीने अधिकाऱ्यांची बैठक घेण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**महिलारोजगारमेळावा**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अनुषंगानं पुण्यात अनेक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्याचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभाग आणि यशस्वी संस्थेनं संयुक्तपणे येत्या शनिवारी ८ मार्च रोजी सकाळी १० वाजता चिंचवडच्या यशस्वी भवन इथं 'पंडीत दीनदयाल उपाध्याय महिला रोजगार मेळाव्याचं आयोजन केलं आहे. या मेळाव्यामध्ये १० वी, १२ वी, पदवीधर अशा विविध पात्रताधारक महिला उमेदवारांना नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. पुणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छुक महिला उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावा, असं आवाहन सहायक आयुक्त सा. बा. मोहिते यांनी केलं आहे.

**टपालविभाग**

महिला दिनाच्या निमित्तानं चरोली इथं टपाल विभागाचं कार्यालय सुरू होत असल्याची माहिती पुणे ग्रामीण टपाल अधीक्षक बी. पी. एरंडे यांनी दिली.

**Pmtमहिला**

पीएमपीएमएलनं महिलांसाठी सुरू केलेल्या तेजस्विनी या विशेष बसमधून शनिवारी महिलांना मोफत प्रवास करता येणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील १३ मार्गांवर ही मोफत सेवा दिली जाणार आहे. पीएमपीएमएलच्या व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष दीपा मुधोळ-मुंडे यांनी हे आदेश दिले आहेत.

**Pcmcमहिला**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महिला बचतगटांसाठी सक्षमा प्रकल्प राबवला जातो; या बचत गटांसाठी मार्गदर्शन मेळाव्याचं आयोजन नुकतंच करण्यात आलं होतं. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी विविध कंपन्यांशी भागीदारी करण्यासाठी महापालिका सहकार्य करणार आहे.

**महिलापुरस्कार**

स्वानंद सोशल फेडरेशन आणि संवाद पुणे संस्थेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आशा सुमतीलाल शहा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'आशा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. दिव्यांग असूनही मेंदी मॅरेथॉनमध्ये राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करणाऱ्या सुचित्रा खरवंडीकर आणि ज्युदोपटू सोनाली वाजगे यांचा 'आशा पुरस्कारा' ने सन्मान केला जाणार आहे. येत्या रविवारी ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांच्या हस्ते पुरस्काराचं वितरण होणार आहे.

**किसानगप्पा**

शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन नवीन संशोधन केलं पाहिजे; यासाठी संघटित होण्याची गरज आहे, असं प्रतिपादन कृषी संचालक सुनील बोरकर यांनी केलं आहे. पुरंदरमध्ये कृषी विभाग आणि आत्मा यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या 'किसान गप्पा गोष्टी' कार्यक्रमात ते बोलत होते. आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी जांभूळ आणि आंबा या दोन्ही फळ पिकांकडे वळलं पाहिजे, असं बोरकर म्हणाले.

**Pcmcस्वच्छता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं स्वच्छतेबरोबरचं शहरातील सार्वजनिक जागा कल्पकतेनं सजवण्यावर भर दिला आहे. भोसरीच्या हुतात्मा विजय साळसकर मार्गावरील गुडविल चौकात महानगरपालिकेनं सुशोभिकरण केलं आहे. त्यासाठी टायर, तुटलेले पाईप, प्लास्टिकच्या बाटल्या, दगड इत्यादी वस्तूंचा वापर करण्यात आला आहे. या सुशोभिकरणामुळे हा परिसर लक्षवेधी ठरत आहे.

**फसवणूक**

APS वेल्थ या कंपनीच्या माध्यमातून ६०० गुंतवणूकदरांची १२५ कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या राठोड दाम्पत्याविरोधात पुणे सत्र न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केला आहे. अविनाश राठोड आणि विशाखा राठोड यांनी शेअर बाजारात पैशाची गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने फसवणूक केली असल्याचं पोलीस तपासात उघडकीला आलं आहे.

**रेल्वे**

मध्य रेल्वेच्या देखभाल दुरुस्तीच्या कामामुळे चिंचवड ते खडकी दरम्यानचा पूल येत्या ७ ते ९ मार्च दरम्यान वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. तसंच कान्हे गावातील रेल्वे पूल डांबरीकरणाच्या कामामुळे ७ मार्च रोजी बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत या मार्गावरील वाहतूक इतर मार्गाने वळवण्यात येणार असल्याचं मध्य रेल्वेनं कळवलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३७ तर किमान १३ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या तापमानात किंचित वाढ होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**